RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ४(२)] मंगळवार, जानेवारी २०, २०२६/पौष ३०, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**नगरविकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १९ जानेवारी २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,१९६६.**

क्र. टिपीबी-४३२३/३८८/प्र.क्र.१२०/२०२५/नवि-११.—ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करणेत आलेला आहे.) च्या तरतुदींनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका त्यांचे अधिकार क्षेत्राकरिता (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त महानगरपालिका" असा करणेत आलेला आहे.) नियोजन प्राधिकरण आहे;

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३१ पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने अधिसूचना क्र. टिपीबी-४३१७/६२९/प्र.क्र.१९८/२०१७/वियो/नवि-११, दि.८/०५/२०१८ (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करणेत आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारूप विकास योजना २०३४ (यापुढे याचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करणेत आलेला आहे) सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ ला (यापुढे याचा उल्लेख "उक्त नियमावली" असा करणेत आलेला आहे) उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेले सारभूत स्वरुपाचे फेरबदल (ई.पी.) वगळून उक्त अधिसूचनेत परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या सुधारणेसह मंजुरी दिली आहे; आणि ज्याअर्थी शासनाने उक्त अधिसूचनेस सम क्रमांकाचे शुध्दीपत्रक दि.२२ जून २०१८ रोजी निर्गमित केले आहे ;आणि ज्याअर्थी, त्यानंतर उक्त अधिसूचनेस शासनाने समक्रमांकाचे शुध्दीपत्रक व पुरकपत्र दि. २९ जून, २०१८ रोजी पारित केले असून सदर शुध्दीपत्रक व पुरकपत्र **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** दि. ३० जून, २०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे; आणि ज्याअर्थी, उक्त नियमावली दि.१/०९/२०१८ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने दि.२९/०१/२०२५ रोजीचे पत्रान्वये शासन नगरविकास विभागास प्रस्ताव सादर केला असून सदर पत्रात असे नमूद आहे कि, शासनाने दि.२१/११/२०२३ रोजी अधिसूचना क्र.टिपीबी-४३१९/३८६/प्र.क्र.१५४/२०१९/नवि-११ द्वारे बृहन्मुंबई हद्दीतील दहिसर (पश्चिम) येथील लिंक रोड ते मिरा भाईंदर हद्दीतील भाईंदरपर्यंत प्रस्तावित ४५ मी रुंदीचा रस्ता मंजूर केला आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या Bridge Department च्या नियोजनानुसार, प्रस्तावित ४५ मी रुंदीच्या विकास योजना रस्ता व नवीन लिंक रोडसाठी जंक्शन आवश्यक आहे; तसेच विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संवर्धन युनिट यांनी विकास योजना २०३४ मध्ये प्रस्तावित 'दहिसर कांदळवन उद्यानास' पोहच रस्ता समाविष्ट करण्याची विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त विनंती विचारात घेऊन उक्त महानगरपालिकेने उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे पोट कलम (१) नुसार प्राप्त अधिकारांतर्गत मंजूर विकास योजना-२०३४ मधील आर/उत्तर विभागातील मौजे-एकसर, न.भू.क्र.५३२अ(भाग), ५३४(भाग), ६६०अ/३(भाग) व ६६१(भाग) या जागेवरील ४५ मी. रुंद उन्नत मार्ग (किनारी मार्ग शेवटचा टप्पा) व अस्तित्वातील लिंक रोड यांचे प्रस्तावित जंक्शन (अंदाजे २२,००० चौ.मी. क्षेत्र) हे रस्त्याचा भाग म्हणून मंजूर विकास योजनेमध्ये अंतर्भूत करण्याबाबत आणि प्रस्तावित 'दहिसर कांदळवन उद्यानास' पोहच रस्ता म्हणून मौजे दहिसर, न.भू.क्र.१ (भाग), २०७ (भाग), २०८ (भाग) या जागेवर असलेल्या अस्तित्वातील रस्त्याच्या संरेखनानुसार अंदाजे १००० मी. लांबीचा व ९.१५ मी. रुंदीचा विकास योजना रस्ता प्रस्तावित करणेकरिता फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित केला आहे (यापुढे याचा उल्लेख "प्रस्तावित फ़ेरबदल" असा करणेत आलेला आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने सदर प्रस्तावित फेरबदलाची सूचना सामान्य जनतेच्या सूचना/हरकतीकरिता **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दि.०५ ते ११ डिसेंबर, २०२४ रोजी प्रसिध्द केली आहे; आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने उक्त अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वये प्रस्तावित फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करून दि. २९/१/२०२५ चे पत्रान्वये फेरबदल प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचेकडील दि.१८/०६/२०२५ रोजीचे पत्राद्वारे सदर प्रस्तावित फेरबदलावर अहवाल सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी उक्त महानगरपालिकेची विनंती विचारात घेऊन व संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर प्रस्तावित फेरबदल मंजूर करणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झालेले आहे.

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७(२) अन्वये प्राप्त अधिकारात आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करून शासन याद्वारेः -

अ) उक्त प्रस्तावित फेरबदलाचे प्रस्तावास सोबतचे परिशिष्टामध्ये नमूद केलेप्रमाणे मंजुरी देत आहे.

ब) सदरची अधिसूचना **शासकीय राजपत्रामध्ये** प्रसिद्ध झाल्याचा दिनांक हा उक्त फेरबदल अंमलात आलेचा दिनांक असेल.

क) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उक्त विकास योजनेच्या मंजुरी सोबतच्या फेरबदलाचे परिशिष्टामध्ये शेवटच्या नोंदीनंतर सोबतचे परिशिष्ट समाविष्ट करणेचे निर्देश देत आहे.

**परिशिष्ट**

**शासन नगरविकास विभागाकडील म.प्रा. व न.र. अधिनियमाचे कलम ३७(२) अन्वये अधिसूचना क्र. टिपीबी-४३२३/ प्र.क्र.१२०/२०२५/नवि-११, दि. १९/०१/२०२६ सोबतचे परिशिष्ट)**

i. Junction of 45m wide DP road & Existing Link road affecting land bearing CTS No. 532A(pt), 534(pt), 660A/3(pt) & 661(pt) of village Eksar having area admeasuring 22,000 sq.mt (approx.) as road area/interchange is sanctioned as shown on plan.

ii. Proposed 9.15m wide DP road affecting land bearing C.T.S. No. 1(Pt), 207(pt) & 208(pt) of Village Dahisar having approx. length of 1000mt as per alignment of existing road on site as an approach road to proposed Mangroves Park is sanctioned as shown on plan.

सदर अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* (कायदे /नियम) या वेबसाईटवर देखील उपलब्ध करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**निर्मलकुमार पं. चौधरी,**
शासनाचे उप सचिव.

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032.

Date 19th January, 2026.

*NOTIFICATION*

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

No.TPB-4323/388/C.R.120/2025/UD-11.— Whereas, the Municipal Corporation of Greater Mumbai is the Planning Authority for the area within its jurisdiction (hereinafter referred to as "the said Corporation") as per the provision of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act").

Whereas, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of Section 31 of the said Act, the State Government *vide* Notification No. TPB-4317/629/CR-118/2017/DP/UD-11, Dt. 08/05/2018 (hereinafter referred to as "the said Notification") has accorded sanction to the Draft Development Plan 2034 of Greater Mumbai (hereinafter referred to as "the said Development Plan") along with the Development Control and Promotion Regulations 2034 (hereinafter referred to as "the said Regulations") for Greater Mumbai with modifications shown in SCHEDULE-A appended to the said Notification excluding the substantial modifications as shown in SCHEDULE-B appended to the said Notification; And whereas, Government has issued corrigendum of even number dt. 22nd June, 2018; and whereas, thereafter Government has issued a Corrigendum and Addendum of even number dt. 29th June, 2018 to the said Notification, which is published in *Government Gazette* dt. 30th June, 2018; and whereas, the said Regulations have come into force from 1/09/2018;

And whereas, Government in Urban Development Department has received a proposal *vide* letter dtd.29/01/2025 from the said Corporation wherein it is stated that, Government of Maharashtra, *vide* notification No. TPB-4319/386/Cr -154/2019/UD 11, dated 21st Novemebr, 2023 has sanctioned the proposed 45m wide road from Link Road at Dahisar(W) in BMC limits to Bhayandar in MBMC limits. Further as per planning of BMC Bridge Department, the junction for proposed 45m wide DP road and new link road is necessary and also Divisional Forest Officer, Mumbai Mangroves Conservation unit has also requested to include approach road for proposed Mangroves Park in DP 2034.

And whereas, considering the above request, in exercise of the powers conferred under sub-section (*1*) of Section 37 of the said Act, the said Corporation has initiated modification proposal to modify junction of proposed 45m wide DP road & New Link road (Existing road) affecting land bearing CTS No. 532A, 534, 661 & 660A/3 of village Eksar having area admeasuring 22,000 sq.mt as road area/interchange and also to include 9.15m wide DP road affecting land bearing C.T.S. No.1(Pt), 207(pt) & 208(pt) of Village Dahisar having approx. length of 1000mt as per alignment of existing road on site as an approach road to proposed Mangroves Park(hereinafter referred to as 'the proposed modification');

And whereas accordingly, the said Corporation had issued Notice for inviting suggestions/ objections from the general public with regard to the proposed modification which is published in *Maharashtra Government Gazette* on 05-11 December 2024; And whereas, the said Corporation after completing the legal procedure regarding the proposed modification as stipulated under Section 37(*1*) of the said Act, has submitted the modification proposal *vide* letter dated 29/01/2025 to the Government for sanction;

And whereas, Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* his letter dated 18/06/2025 has submitted his report to the Government on the proposed modification;

And whereas, after considering the request of the said Corporation and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, the Government is of the opinion that the proposed modification is required to be sanctioned;

Now, therefore, in exercise of the powers conferred upon it under Section 37(*2*) of the said Act, the Government hereby:-

A) Sanctions the proposed modification as described more specifically in the Schedule attached herewith.

B) Fixes the date of publication of this Notification in the *Official Gazette* as the date of coming into force of this modification.

C) Directs the Municipal Corporation of Greater Mumbai that in the Schedule of Modifications sanctioning the said Development Plan, after the last entry, the Schedule referred to at (A) above shall be added.

*Schedule*

**Accompaniment to the Government in Urban Development Department Notification u/s 37(2) of MRTP Act 1966, *vide* No. TPB- 4323/C.R.120/2025/UD-11, dated:-19th January, 2026**

i. Junction of 45m wide DP road & Existing Link road affecting land bearing CTS No. 532A(pt), 534(pt), 660A/3(pt) & 661(pt) of village Eksar having area admeasuring 22,000 sq.mt (approx.) as road area/interchange is sanctioned as shown on plan.

ii. Proposed 9.15m wide DP road affecting land bearing C.T.S. No. 1(Pt), 207(pt) & 208(pt) of Village Dahisar having approx. length of 1000mt as per alignment of existing road on site as an approach road to proposed Mangroves Park is sanctioned as shown on plan.

This Notification shall also be published on the Maharashtra Government website-*www.maharashtra.gov.in* (Acts/ Rules)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NIRMALKUMAR CHAUDHARI,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.